
# गोष्टीतील बेरीज–२

- गौरीकडे १५ रुपये होते. आईने तिला अजून २६ रुपये दिले, तर आता तिच्याकडे किती रुपये झाले ?

  काय दिले आहे ? गौरीकडे १५ रु., आईने २६ रु. दिले

  काय विचारले आहे ? गौरीकडे एकूण किती रुपये

  काय करूया ? ------------------



| द | ए | |
|---|---|---|
| १ | | |
| १ | ५ | गौरीकडचे रुपये |
| + २ | ६ | आईने दिलेले रुपये |
| ४ | १ | एकूण रुपये |


**उदाहरण वाच. पाटीवर दशक–एकक रकाने आखून योग्य ठिकाणी अंक लिहून बेरीज कर.**

- एका माळावर २४ गाई आणि २८ म्हशी चरत होत्या, तर माळावर एकूण किती गुरे चरत होती ?
- सलमाने काल ३४ रुमाल शिवले. आज तिने आणखी ३८ रुमाल शिवले, तर सलमाने दोन दिवसांत मिळून किती रुमाल शिवले ?
- वसिमकडे २५ गोट्या होत्या. आज खेळात त्याने १३ गोट्या जिंकल्या, तर आता वसिमकडे किती गोट्या आहेत ?
- दुकानदाराकडे काल ३५ पतंग होते. आज त्याने अजून १९ पतंग आणले, तर आता दुकानदाराकडे एकूण किती पतंग झाले ?

**खालील बेरजांसाठी गोष्टी तयार कर आणि सोडव.**

- २२ + ३७
- ३४ + २८
- ३० + १९
- २६ + ३४
- ५९ + २९
- ४९ + १७

## सोपी बेरीज व वजाबाकी, दशक वाढवून किंवा कमी करून.

४१ + १० = 

४ दशक १ एकक + १ दशक = ५ दशक १ एकक

४१ + १० = ५१


४१ - १० = 

४ दशक १ एकक − १ दशक = ३ दशक १ एकक

४१ − १० = ३१


इथे आपण १० च्या टप्प्याने बेरीज व वजाबाकी करायला शिकलो.

## बेरीज (२० ने वाढवून), वजाबाकी (२० ने कमी करून)

३७ + २० = 

३ दशक ७ एकक + २ दशक = ५ दशक ७ एकक

३७ + २० = ५७

३७ - २० = 

३ दशक ७ एकक − २ दशक = १ दशक ७ एकक

३७ − २० = १७

- बेरीज कर.

६ + १० = ☐ १८ + २० = ☐

२९ + ३० = ☐ ६२ + १० = ☐

७७ + २० = ☐ ८४ + १० = ☐

- वजाबाकी कर.

१५ − १० = ☐ २६ − १० = ☐

३४ − २० = ☐ ५३ − १० = ☐

६७ − २० = ☐ ९२ − ३० = ☐

**विचार कर :** दिलेल्या संख्येतून १०, २० कमी करताना किंवा १०, २० वाढवताना काय करावे ?



LDXATI